पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८
लेखा विभाग
क्र.लेखा/पेन्शन /३२अ/कावि / ४२ /२०१९
दि.१८/ ०९ /२०१९ ९९६

विषय :- दिनांक ०१/११/२००५ नंतर शासकीय सेवेत रूजू झालेल्या कर्मचा-यांना अर्जित रजेचे रोखीकरणाचा लाभ देणेबाबत...

परिपत्रक

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा)नियम १९८१ मधील नियम ६८ नुसार नियत वयोमान सेवानिवृत्तीच्या वेळी कर्मचा-यांच्या खाती जमा असलेल्या अर्जित रजेच्या बाबतच्या रजा वेतनाची सममुल्य रोख रक्कम व नियम ६९ नुसार सेवेत असताना मरण पावल्यास रजा वेतनाची सममुल्य रोख रक्कम अदायगीची तरतूद आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. अरजा २४०१/सेवा -९, दिनांक १५ जानेवारी २००१ नुसार अर्जित रजा रोखीकरण करण्याची मर्यादा ३०० दिवस करण्यात आली आहे. उक्त नियम आणि शासन निर्णयाचे अनुषंगाने महापालिका अधिकारी/कर्मचा-यांचे अर्जित रजा रोखीकरणाची कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि महाराष्ट्र शासन वित्त् विभाग शासन निर्णय अ.नि यो/१००५/१२६/सेवा, दि.३१ ऑक्टोबर २००५ नुसार, दि.१ नोव्हेंबर २००५ अन्वये ज्या अधिकारी/ कर्मचा-यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) लागू आहे. त्यांना वरील अर्जित रजा रोखीकरण संदर्भातील कार्यवाही प्रलंबित होती. अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) मधील कर्मचा-यांना देखील महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६८ व ६९ लागु असल्याने, सर्व विभाग प्रमुखांनी आढावा घेउन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेतील (DCPS) ज्या अधिकारी/कर्मचा-यांची अर्जित रजा रोखीकरणाची प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यांनी ती प्रकरणे तातडीने निकाली काढुन बिले लेखा विभागाकडे अदायगी कामी सादर करावीत.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८